# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

☎ : २४०१०४३७/ २४०२०७८१/ २४०१४७०१
फॅक्स : २४०२४०६८
visit us at : http//mpcb.gov.in
email : enquiry@mpcb.gov.in

कल्पतरु पॉइंट, २/ ३/ ४ था माळा,
सिने प्लॅनेट समोर, सायन सर्कल,
सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.

---

**क्रमांकः मप्रनि / सह-सं. (हप्रनि.)/** ४३९०

**दिनांकः-** १५ **/१०/२०१५**

**प्रति,**
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
ठाणे /नवी मुंबई / कल्याण

**विषयः-** दिनांक ३०/०९/२०१५ रोजी मा. सदस्य सचिव ,म.प्र.नि. मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या तारापूर, नवी मुंबई / डोंबिवली अतिप्रदूषित क्षेत्रातील प्रदूषण निर्देशांक कमी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या कृती आराखडा अंमलबजावणीसाठी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत ..

उपरोक्त विषयाबाबतचे इतिवृत्त मा. सदस्य सचिव, म.प्र.नि. मंडळ यांनी मान्य केले आहे. तरी याबाबत आपल्या कार्यालयाशी संबधीत विभागांना / कारखान्यांना पत्राव्दारे कळविण्यात यावे व त्यासंबंधीचा कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा. (सोबत इतिवृत्ताची छायांकित प्रत जोडली आहे.)

**सोबतः- वरीलप्रमाणे.**

**(वि. मो. मोटघरे)** 15/X/15
सह-संचालक (हप्रनि)

**मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ याच्या अध्यक्षतेखाली तारापूर औद्योगिक परिसरातील सर्वकष पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) कालबध्द कार्यक्रमाबाबतची दि.३०/०९/२०१५ रोजी म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, मुंबई येथे झालेल्या पर्यावरण कृती आराखडा आढावा बैठकीचे इतिवृत.**

\- - - - - -

मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दि.३०/०९/२०१५ रोजी म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, सायन, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीसाठी उपस्थित असलेले अधिकारी व उद्योगाचे प्रतिनिधी, तसेच संबंधित शासकीय अधिकारी यांची यादी सोबत जोडली आहे.

सभेच्या प्रस्तावनेमध्ये मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी दिल्ली यांच्या अहवालानुसार, तारापुर, जि.पालघर औद्योगिक क्षेत्र हे अतिप्रदूषित म्हणून जाहिर करण्यात आलेले होते असे नमुद केले. त्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्देशांक कमी करण्याच्यादृष्टीने कृती आराखडा शासनास सादर केला होता. सदर कृती आराखडयामध्ये अल्प व दीर्घ मुदतीत प्रदूषण निर्देशांक कमी करण्याबाबतच्या उपाययोजनांचा समावेश आहे. सदर उपाययोजनेबाबत प्रभावी अंमलबजावणीची सद्य:स्थितीबाबत व त्यावर उपाययोजनाबाबत बैठक घेण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

सह संचालक (ह.प्र.नि.), मुख्यालय यांनी कृती आराखडयाबाबतचा सद्य:स्थितीच्या अहवालचे विस्तृतपणे सादरीकरण करण्यात आले.

सदर निर्देशांक कमी करण्यासाठी म.प्र.नि.मंडळाने कृती आराखडयाचा पाठपुरावा करुन, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सुचविलेल्या हवा, जल व भूमीमध्ये झालेल्या प्रदूषणाची तीव्रता कमी करण्यासाठी उद्योगाकडून उपाययोजना करुन घेण्यात आलेल्या आहेत व करण्यात येत आहेत. जल प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या २५ दशलक्ष घनलिटर क्षमतेच्या सामुहिक सांडपाणी प्रकिया यंत्रणेव्यतिरिक्त ५० दशलक्ष घनलिटर क्षमतेचा सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र प्रस्तावित असून मागील ३ महिन्यांपासून सदरील बांधकाम पावसाळा असल्यामुळे स्थगित करावे लागले होते, परंतु नुकतेच ते मागील २ दिवसांपासून पुन्हा सुरु केले असल्याचे सी.ई.टी.पी.च्या प्रतिनिधीकडून सांगण्यात आले. तसेच ते काम एप्रिल,२०१६ पर्यंत पूर्ण होईल, असे सांगितले. त्यावर मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी निर्देश दिले की, सदरील काम १ फेब्रुवारी, २०१६ पर्यंत पूर्ण करावे व त्याबाबतचा समयबध्द आराखडा (Bar Chart) मंडळाकडे सादर करावा असे बजावले.

- सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या २५ एम.एल.डी. इतक्या क्षमतेच्या सामुहिक सांडपाणी केंद्रातून उत्सिंजत होणाऱ्या प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाण्याची गुणवत्ता विहित मर्यादेत येत नसल्याचे प्रादेशिक अधिकारी, ठाणे यांनी सांगितले. याबाबत मा.सदस्य सचिव यांनी अतिशय तीव्र नाराजी व्यक्त करुन भविष्यात अशा

प्रकारच्या त्रुटीबाबत कडक कारवाई करण्यात येईल, असे सीईटीपीच्या प्रतिनिधीस व उपस्थितीत उद्योजकांना समज दिली.

- म.औ.वि.महामंडळाच्या तारापूर औद्योगिक वसाहती अंतर्गत सांडपाणी वाहून नेणाऱ्या बंद पाईपलाईनची बऱ्याचवेळा गळती होत असल्याचे निर्दशनास येते. याबाबत म.औ.वि.मंहामंडळाच्या अधिकाऱ्यांनी याबाबतीत त्वरीत कारवाई करुन ती बंद करण्यात येते असे नमूद केले. परंतु, याबाबत कायमस्वरुपी कार्यवाही होणे गरजेचे असल्याचे प्रादेशिक अधिकारी, ठाणे यांनी नमूद केले.
- म.औ.वि.महामंडळाच्या तारापूर औद्योगिक वसाहती अंतर्गत पावसाळी पाणी वाहून नेणाऱ्या नाली बांधणे अत्यंत आवश्यक आहे. कारण पावसाळयामध्ये बहुतेक वेळा औद्योगिक परिसरातील रसत्यावर पाणी साचत असल्याचे प्रादेशिक अधिकारी ठाणे, यांनी नमूद केले. म.औ.वि.मंहामंडळाच्या अधिकाऱ्यांनी याबाबतीत आवश्यक ती उपाययोजना करणार असल्याचे नमूद केले. याबाबत मा.सदस्य सचिव म.प्र.नि.मंडळ यांनी समयबध्द कृती आराखडा सादर करण्याबाबत निर्देश दिले.
- प्रादेशिक अधिकारी ठाणे, यांनी असे निर्देशनास आणून दिले की, ५० एमएलडी इतक्या क्षमतेचा सामायिक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प जरी फेब्रुवारी २०१६ रोजी पूर्ण होणे प्रस्तावीत असले तरी, एन.आय.ओ. नुसार प्रस्तावित निचरा करणाऱ्या पाईपलाईनचे काम २०१८ रोजी पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे जरी, ५० एमएलडी प्रकल्प उभारणीचे काम पूर्ण होत असले तरी सदर प्रकल्प सुरु करण्यास परवानगी देता येणार नसल्याचे नमूद केले. याबाबत म.औ.वि.मंहामंडळाचया अधिकाऱ्यांनी सदर पाईपलाईनचे काम पूर्ण करणार असल्याचे नमूद केले.
- तारापूर औद्योगिक क्षेत्रातील उदयोगांनी कोळशाऐवजी वायू इंधन म्हणून वापरणे आवश्यक असल्याचे सह संचालक (ह.प्र.नि.), मुख्यालय यांनी नमूद केले. याबाबत प्रादेशिक अधिकारी, ठाणे यांनी तारापूर औद्योगिक परिसरात एकूण ६१ एकूण लहान मध्यम मोठे उदयोग कोळसा इंधन म्हणून वापरत असल्याचे नमूद केले तसेच या सर्व उदयोगांनी गॅस इंधन म्हणून वापरावा याबाबत दिनांक ११.०९.२०१५ रोजी निर्देश बजावले असल्याचे नमूद केले सदयसिथतीत मे.जे.एस.डब्लू एम.आय.डी.सी तारापूर या उदयोगांनी कोळशाऐवजी गॅस इंधन म्हणून वापरणे सुरु केले आहे. तसेच इतर ५ मोठे उदयोग लवकरच गॅसचा इंधन म्हणून वापर करण्यात असल्याचे नमूद केले. याबाबत गेलच्या प्रतिनीधींनी असे नमूद केले की, तारापूर एम.आय.डी.सी मधील मोठया व मध्यम उदयोगांना त्यांच्या मागणीनुसार गॅस पुरवठा करण्यात येईल. सह-संचालक ह.प्र.नि शाखा मुख्यालय यांनी याबाबत लवकरच बैठक घेऊन आढावा घेण्याचे निर्देश प्रादेशिक अधिकारी, ठाणे यांना दिले.
- सह संचालक (ह.प्र.नि.), म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय यांनी अतिरिक्त औदयोगिक सांडपाणी निर्माण होत असल्याबाबतचा मुद्दा निर्दशनास आणला. याबाबत प्रादेशिक अधिकारी ठाणे यांनी असे नमूद केले की, सद्य:स्थितीत तारापूर औदयोगिक वसाहतीमधील एकूण ३७ उदयोगांना त्यांचे औदयोगिक सांडपाण्याचे

मोजमाप करण्यासाठीचे मीटर बसवण्यासाठी निर्देश दिले असून त्यापैकी एकूण १४ उदयोगांनी सदर मीटर बसविले असून इतर उर्वरीत उदयोग पुढील महिनयापर्यंत सदर मीटर बसवणार असल्याचे नमूद केले याबाबत सह संचालक (ह.प्र.नि.), म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय यांनी असे निर्देशिक केले की, ज्या उदयोगांनी अदयापपर्यंत मीटर बसविले नाहीत अशा उदयोगाकडून मीटर बसवण्यासाठी येणाऱ्या एकूण खर्चापैकी १० टक्के इतक्या रकमेची बॅक हमी घेण्याचे निर्देश दिले तसेच सर्व उदयोगांनी पुढील एक महिन्यात मीटर बसविणे आवश्यक असल्याचे नमूद केले.

- प्रादेशिक अधिकारी ठाणे, यांनी असे नमूद केले की, दि.३.७.२०१५ रोजीच्या बैठकीच्या इतिवृतानुसार म.औ.वि.मंहामंडळास त्यांच्याकडून करण्यात येणाया पुरवठा करण्यात येणाऱ्या एकूण पाणीपुरवठयापैकी २५ टक्के इतका कमी पाणीपुरवठा करण्याबाबत निर्देश बजावण्यात आले आहेत. याबाबत म.औ.वि.महामंडळाच्या प्रतिनिधीनी कार्यवाही करण्यात येईल असे नमूद केले.
- सह संचालक (ह.प्र.नि.), म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय यांनी तारापूर औदयोगिक परिसरात संमतीपत्रविना कार्यरत उदयोगांचा सर्वे करुन जे उदयोग विनापरवाना सुरु आहे, अशा उदयोगावर कारवाई करण्यात यावी असे नमूद केले. तसेच तारापूर औदयोगिक परिसरातील प्रदूषणकारी उदयोगांची पाहणी करुन आवश्यक ती कारवाई करण्याबाबत निर्देश दिले.
- सह संचालक (ह.प्र.नि.), म.प्र.नि मंडळ, मुख्यालय यांनी उपस्थित उदयोगांच्या प्रतिनिधीना असे निर्देशित केले की, जे उदयोग २० घनमीटर प्रतिदिन किंवा त्यापेक्षा जास्त घरगुती सांडपाणी निर्माण करत असतील, अशा सर्व उदयोगांनी त्यांची स्वत:ची स्वतंत्र घरगुती सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारणे आवश्यक आहे व याबाबत सर्व उदयोगांनी कार्यवाही करणे अपेक्षित असल्याचे बजावण्यात आले.

**सर्वकष पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) तारापूर औद्योगिक परिसराची गुणवत्ता कमी करण्यासाठी संबंधित विभागाने करावयाची कामे:-**

| अ. क्र. | उपस्थित मुद्दे | जबाबदार संस्था | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | नविन ५० एमएलडी सीईटीपी उभारणे व कार्यान्वित करणे. | टीईपीएस - सीईटीपी व टीमा | १ फेब्रुवारी, २०१६ पुर्वी |
| २ | २५ एमएलडीच्या सीईटीपीमध्ये सुधारणा करणे | टीईपीएस - सीईटीपी व टीमा | १५ दिवस |
| ३ | ड्रेनेज पाईप लाईनची गळती थांबविणे, तसेच चेंबर ओव्हरफलो होणे, इ. समस्या | म.औ.वि.महामंडळ | नियमितपणे |
| ४ | तारापूर औदयोगित क्षेत्रात स्टॉर्म वॉटर ड्रेन बांधकामाबाबत कालबध्द आराखडा तयार करुन सादर करणे | म.औ.वि.महामंडळ | २ महिने |
| ५ | तारापूर औदयोगित क्षेत्रात स्टॉर्म वॉटर ड्रेन बांधणे, | म.औ.वि.महामंडळ | १ वर्ष |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | तारापूर औदयोगित क्षेत्रात उर्वरित २० कि.मी.आरसीसी पाईप लाईन बदलुन एचडीपीईची टाकण्याबाबतचा कार्यपुर्ती अहवाल | म.औ.वि.महामंडळ | १५ दिवस |
| ७ | समुद्र विज्ञान संस्थेने निर्देशित केल्याप्रमाणे, ७.१ कि.मी. पाईपलाईन खोल समुद्रात टाकणे. | म.औ.वि.महामंडळ | २ वर्ष किंवा पर्यावरणीय अनुमती नुसार दिलेला कालावधी यापैकी जो कमी असेल असा कालावधी |
| ८ | तारापूर औदयोगिक क्षेत्र सीईपीआयच्या कक्षेत येत असल्याने पुढील तीन महिन्याच्या कालावधीत मोठया व मध्यम स्वरुपाच्या कारखान्यांनी कोळसा ऐवजी सीएनजी गॅसचा वापर करणे. सदरबाबत मे.गेल इंडिया, मे.टिमा व मोठया व मध्यम उदयोगाने याबाबत महिनेवारी अहवाल सादर करणे | मे.गेल इंडिया लि. मे.टीमा, मोठया व मध्यम स्वरुपाचे कारखाने | ३ महिना |
| ९ | तद्नंतर पुढील कालावधीत सर्वच उदयोगांनी कोळसा ऐवजी सीएनजी गॅसचा वापर करावा | मे.गेल इंडिया लि. मे.टीमा, लघु स्वरुपाचे कारखाने | १ वर्षं |
| १० | स्वयंचलित हवा गुणवत्ता तपासणी केंद्र सीपीसीबीच्या प्रणालीनुसार उभारणे | म.प्र.नि. मंडळ | ४ महिने |
| ११ | अतिरिक्त औद्योगिक सांडपाणी निर्मिती | म.प्र.नि. मंडळ, म.औ.वि. महामंडळ, टीईपीएस - सीईटीपी व टीमा | ३ महिने |
| १२ | तारापूर औदयोगिक क्षेत्रात ज्या उद्योगांनी म.प्र.नि मंडळाचे समंतीपत्र घेतले नाही परंतु उत्पादन चालू आहे अशा उद्योगांचे सर्वेक्षण करणे व त्यावर कारवाई करणे. | म.प्र.नि. मंडळ | ३ महिने |
| १३ | तारापूर औदयोगिक क्षेत्रात जे उद्योग पोटभाडा पध्दतीने (Sub-letting) उद्योग चालवत आहे, अशा कारखान्यांचे सर्वेक्षण करणे व त्यावर कारवाई करणे. अशा प्रकारच्या पोटभाडा पध्दतीबाबत (Sub-letting), म.औ.वि. महामंडळाने म.प्र.नि मंडळास कळविणे. | म.प्र.नि. मंडळ व म.औ.वि.महामंडळ | १ महिना |
| १४ | म.प्र.नि मंडळामार्फत भरारी पथक स्थापन करुन, तारापूर औद्योगिक क्षेत्राचे सर्वेक्षण करणे व दोषी कारखान्यांवर कारवाई करणे. | म.प्र.नि. मंडळ | २ महिने |
| १५ | तारापूर औद्योगिक वसाहतीतील प्रदुषणकारी प्रमुख उद्योगांनी इलेक्ट्रॉनिक फ्लो मीटर व डाटा लॉगर बसविणे. | म.प्र.नि.मंडळ | १ महिना |
| १६ | म.औ.वि.महामंडळाकडून सद्य:स्थितीत पुरविण्यात येणाऱ्या एकूण पाणी पुरवठयापैकी २५ टक्के इतका पाणी कमी करणे. | म.औ.वि.महामंडळ | ७ दिवस |

सह संचालक (हप्रनि), म.प्र.नि.मंडळ, मुंबई यांनी असे सूचित केले की, सर्व भागधारकांनी (Stake holders) विशेष बाब म्हणून वरीलप्रमाणे अंमलबजावणी करावी व त्याचा अहवाल उप प्रादेशिक कार्यालय, तारापूर, प्रादेशिक कार्यालय, ठाणे व मुख्यालय यांच्याकडे सादर करण्यात यावा.

बैठकीच्या समारोपादरम्यान प्रधान वैज्ञानिक अधिकारी म.प्र.नि मंडळ मुख्यालय यांनी उपस्थित अधिकारी व उदयोगांच्या प्रतिनिधींना असे सूचित केले की, तारापूर औदयोगिक परिसरातील प्रदूषणास आळा घालण्यासाठी सर्व संबंधीतांनी आपआपल्या स्तरावर शीघ्र गतीने कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे नमूद केले परंतु, जे उदयोग नियमांचे पालन करणार नसतील अशा उदयोगांवर कठोर कारवाई करण्यात येईल असे नमूद केले. सरतेशेवटी सर्व उपस्थितांचे आभार प्रकट करुन पुढील बैठक नोव्हेंबर २०१५ च्या मध्यावर घेण्यात येईल असे नमूद करुन सह संचालक (हप्रनि), म.प्र.नि मंडळ, मुख्यालय यांनी बैठक संपल्याचे जाहिर केले.

**सह संचालक (हप्रनि)**
म.प्र.नि.मंडळ, मुंबई

**सदस्य सचिव**
म.प्र.नि.मंडळ, मुंबई

- - - - - - - - - - - -